<u>प्रेसनोट</u>                    दि.१९/१०/२०१७

## <u>पोलीस स्मृतिदिन २१ ऑक्टोबर बाबत</u>...

दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जातो. या दिवशी संपुर्ण वर्षात आपले कर्तव्य बजावत असताना कामी आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस दलातर्फे मानवंदना देऊन श्रध्दांजली वाहण्यात येते. हा दिवस पोलीस दलाला अभिमानाचा,शौर्याला मानवंदना देण्याचा,त्याचबरोबर आपल्या जुन्या सहका-यांच्या स्मृतीने मन हेलावणाराही असतो.

२१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन पाळला जाण्यास १९५९ मध्ये लडाख भागातील सरहद्दीवर झालेली घटना कारणीभुत ठरली. भारत चीन सरहद्दीवर लडाख भागात १८ हजार फुट उंचीवर हॉट स्प्रिंग्ज नावाचे ठिकाण आहे. २१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी हॉट स्प्रिंग्ज येथे गस्त चालु होती. गस्ती तुकडी नेहमीप्रमाणे गस्त घालण्यासाठी कुच करत हॉट स्प्रिंगच्या पुर्वेला ६ मैल दुर ती आली असताना पर्वताच्या डाव्या बाजुला तुकडीच्या नेत्याला काही काही संशयास्पद खुणा दिसल्या. तुकडी त्या खुणांच्या अनुरोधाने पुढे चालु लागली आणि अचानक भयानक गोळीबार सुरू झाला. त्याठिकाणी पोलीस वीरांनी शौर्याने तोंड दिले. ही विशेष लढाई लढता लढता यापैकी १० गस्ती शिपायांना वीरमरण आले व ९ जण जखमी अवस्थेत शत्रुच्या हाती सापडले. हे १० अमर शिपाई होते पुरणसिंग,धरमसिंग,इंद्रजित सुबा,नोरबु लामा,शिवनाथ प्रसाद,त्शेरिंग नोरबु, इमामसिंग, सवन सिंग,बेगराज आणि माखनलाल असे होते. त्यावेळी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या छावणीवरही अचानक चिनी सैन्यांनी हल्ला केला होता. या लढाईत कामी आलेल्या या शुर पोलीस जवानांपैकी पश्चिम बंगालचे-३,हरियाणा-२,पंजाब-२,उत्तर प्रदेश--२,हिमाचल प्रदेश-१ असे होते. ही बातमी वा-यासारखी सा-या देशभर पसरली. १३ नोव्हेंबरला चिनी सैनिकांनी या हुतात्म्यांचे मृतदेह भारताच्या ताब्यात दिले. १४ नोव्हेंबरला सकाळी ०८/०० वा.हॉट स्प्रिंग्ज येथे त्यांच्यावर सन्मानपुर्वक अंत्यविधी करण्यात आले. त्यावेळी प्रत्येक राज्यातील पोलीस दलांनी त्या त्या ठिकाणी या वीरांना श्रध्दांजली अर्पण केली.

त्यानंतर पाटणा येथे १९५९ साली झालेल्या अखिल भारतीय पोलीस स्पर्धांच्या वेळी सर्वांनी **'आमच्या हया वीर हुतात्म्यांचे स्मरण आम्ही दरवर्षी २१ ऑक्टॉबरला पोलीस हुतात्मा दिन पाळुन करू'** अशी शपथ घेतली,आणि तेव्हापासुन दरवर्षी हा दिन भारतवर्षात मोठया सन्मानाने **'पोलीस हुतात्मा दिन'** म्हणुन पाळण्यात येतो. राज्या-राज्यातुन पोलीस दले या हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी संचलन आयोजीत करून त्यांना मानवंदना देतात.

दि.१ सप्टेंबर २०१६  ते ३१ ऑगस्ट २०१७ या कालावधीत **देशातील** सर्व राज्यात पोलीस दलाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस जवान (सर्व दर्जाचे) असे एकुण **<u>३७०</u>** जणांनी आपले कर्तव्य बजावत असताना देह धारातीर्थी ठेवले. त्यामध्ये **महाराष्ट्रातील <u>पोलीस कॉन्स्टेबल,ब.नं.५२१०,सुरेश लिंगा तेलामी</u> या पोलीस जवानाचा समावेश आहे.**

**दिनांक २१ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ०८/०० वा.पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे मा.श्री. सौ.मुक्ता शैलेश टिळक,(महापौर,पुणे महानगरपालीका,पुणे) हे प्रमुख अतिथी म्हणुन वरील हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करणार आहेत.**

तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की,पोलीस हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी दिनांक २१ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ०७/५० वा.उपस्थित राहावे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त,कार्यालय,पुणे शहर

पुणे शहर पोलीस आयुक्तालय

**शनिवार, दि.२१ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ०८/०० वाजता**

पोलीस संशोधन केंद्र,पाषाण,पुणे येथे

**“ पोलीस स्मृतिदिन संचलनास ”**

आपणास उपस्थित राहण्याची विनंती करीत आहेत.

**सौ.मुक्ता शैलेश टिळक,(महापौर,पुणे महानगरपालीका,पुणे)**

हया हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करणार आहेत.

---

**: कार्यक्रम :**

**१) मा.प्रमुख पाहुणे यांचे आगमन**

**२) मा.प्रमुख पाहुणे संदेश वाचून दाखवतील.**

**३) परेड सावधान होईल. परेड “शोक शस्त्र” करतील. वीरगती प्राप्त झालेल्या पोलीस अधिकारी व शिपाई यांची नावे वाचली जातील.**

**४) मा.प्रमुख पाहुणे पुष्पचक्र वाहतील. परेड “जनरल सॅल्यूट” देईल. (सर्व उपस्थितांनी उभे रहावे व गणवेषातील सर्वांनी सॅल्युट करावे. “जनरल सॅल्यूट” संपल्यावर आसनस्थ व्हावे.)**

**५) परेड तीन वेळा फैरी झाडतील.**

**६) परेड जनरल सॅल्यूट देईल. ब्युगलर्स “लास्ट पोस्ट”वाजवतील, त्यानंतर १ मिनिटाची स्तब्धता पाळण्यात येईल व नंतर ब्युगलर्स (राऊज) वाजवतील. (सर्व उपस्थितांनी उभे रहावे व गणवेषातील सर्वांनी सॅल्युट करावा.)**

**७) परेड कमांडर मा.प्रमुख पाहुणे यांना संचलन संपल्याचे सांगतील. व कार्यक्रमाची सांगता होईल.**

**सर्व प्रसार माध्यमांचे प्रतिनिधींना कळविण्यात येते की, शनिवार,दि.२१ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ०८/०० वा. पोलीस संशोधन केंद्र,पाषाण,पुणे येथे स्मृतिदिन संचलन आयोजीत करण्यात आलेले आहे.**

**तरी आपण आपले छायाचित्रकारांसह उपस्थित रहावे ही विनंती.**